**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.शिवाजी महादेव जावीर
रा.नेलकरंजी, ता.आटपाडी,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा चिटणीस,**
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०६/२०१०/सांगली |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.शिवाजी महादेव जावीर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडलेले नाही. तसेच अपिलासोबतच्या अन्य कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ. *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सतीश नारायण राक्षे
मु.पो.साळुंब्रे, ता.मावळ, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
तहसीलदार वडगांव मावळ,
ता.मावळ, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
तहसीलदार वडगांव मावळ,
ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.०४.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री.सतीश नारायण राक्षे<br>मु.पो.साळुंब्रे, ता.मावळ, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,<br>तहसीलदार वडगांव मावळ,<br>ता.मावळ, जि.पुणे श्री.सचिन बारवकर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,<br>तहसीलदार वडगांव मावळ,<br>ता.मावळ, जि.पुणे श्री.राजेश चव्हाण | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०४.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०५.११.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०६.१०.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

न्यायालयीन प्रकरणासाठी ७/१२ उताऱ्यावरील फेरफाराच्या व संबंधित कागदपत्रांच्या प्रती वेगवेगळया अर्जांद्वारे आपण मागितल्या होत्या. त्या संदर्भात आपण ९ वेगवेगळे अर्ज दाखल केले. परंतु प्रती मिळाल्या नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सतीश नारायण राक्षे यांनी केली.

फेरफार अभिलेख कक्षात जमा केलेले नसून तलाठी कार्यालयात आहेत, असे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत कळविले होते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसीलदार वडगांव मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.राजेश चव्हाण यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसीलदार वडगांव मावळ, ता.मावळ, जि.पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य असली तरी अर्ज तलाठ्याकडे वर्ग करुन माहिती देण्याबाबत त्यांना कळविणे आवश्यक होते. तलाठ्याकडून संबंधित फेरफार व अनुषंगिक कागदपत्रे प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास प्रती पुरवाव्या, असे मौखिक आदेश आयोगने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.
२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसीलदार वडगांव मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.राजेश चव्हाण यांनी दि.१०.०७.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 18 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विलास वसंत सराफ
गावडे कॉलनी, नमिता अपार्टमेंट,
चिंचवड, पुणे-३३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)**
पुणे विभाग,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
तळेगाव दाभाडे नगर परिषद,
ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६१२/२०१०/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. विलास वसंत सराफ यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 10 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.प्रमोद शिवाजी कवडे
सर्व्हे नं.६६ब, बी.टी.कवडे रोड,
घोरपडी गांव,
पुणे-१

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,**
पुणे ग्रामीण, पाषाण,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
हवेली विभाग, हवेली,
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६१७/२०१०/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.प्रमोद शिवाजी कवडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

डॉ.मृदुला नितीन गंदेविकर
जी ७०३, पदमावती अपार्टमेंट,
यश गार्डन, इंद्रायणी नगर, सेक्टर७,
भोसरी, पुणे-२६

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,**
सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट (सी.आय.आर.टी),
पुणे नाशिक रोड, भोसरी,
पुणे-२६

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट (सी.आय.आर.टी),
पुणे नाशिक रोड, भोसरी,
पुणे-२६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६२१/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सी.आय.आर.टी च्या सेवा शर्तीनियम, सेवा भरती नियम १९९२ ची छायाप्रत तदनुषंगिक ४ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्त्या डॉ.मृदुला नितीन गंदेविकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे ज्या सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द अपील केलेले

आहे, ते प्राधिकरण केंद्रिय आयोगाच्या कार्यकक्षेत येत असल्याने या अपिलावर राज्य माहिती आयोगामार्फत कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने आवश्यक तर केंद्रिय माहिती आयोगाकडे अपील दाखल करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 JUN 2010

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

सौ.शकुंतला महादेव वाकसे
मु.पो.मलवडी, ता.करमाळा,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता (सोमंका),**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६२६/२०१०/सोलापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्त्या सौ.शकुंतला महादेव वाकसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संतोष निवृत्ती होळकर
मु.काठापूर खु., पो.पिंपरखेड,
ता.शिरुर,जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती शिरुर, ता.शिरुर,जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत काठापूर खुर्द,
ता.शिरुर,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४२/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.०६.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता श्री.**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी (पंचायत),<br>पंचायत समिती शिरुर, ता.शिरुर,जि.पुणे श्री.व्हि.एन.यादव<br>**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत काठापूर खुर्द,<br>ता.शिरुर,जि.पुणे तत्कालीन श्री.बी.बी.गोरे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत आपण मागितलेली माहिती तीन महिने विलंबाने दिली. कामकाजाच्या वृत्तांतावर आपली सही असल्याचे ग्रामसेवकांनी म्हटले आहे. त्याबाबत त्यांना व

शिरुर पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांची चौकशी व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.संतोष निवृत्ती होळकर यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.होळकर यांना विहित मुदतीत सर्व माहिती देण्यात आली आहे. पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यांसमोर त्याची नोंद करण्यात आली असून त्यावर अपीलकर्त्यांची पोच आहे, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत काठापूर खुर्द, ता.शिरुर,जि.पुणे श्री.बी.बी.गोरे यांनी केले. याबाबतचा लेखी अहवाल व संबंधितांची पोच असल्याचे पत्र सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत काठापूर खुर्द,ता.शिरुर,जि.पुणे 'प्रत मिळाली.काहीही तक्रार नाही,'अशी श्री.होळकर यांची स्वाक्षरीसह नोंद असलेल्या पत्राच्या प्रतींसह अहवाल श्री.बी.बी.गोरे यांनी दि.२१.०६.२०१० रोजीच्या पत्रान्वये सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 29 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विठ्ठल अंकुश बांदल
मु.पो.खानापूर, ता.भोर,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,**
जिल्हा परिषद, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी,**
जिल्हा परिषद, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २२/०६/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री. विठ्ठल अंकुश बांदल<br>मु.पो.खानापूर, ता.भोर, जि.पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी,**<br>जिल्हा परिषद, पुणे-१<br>श्री.एस.व्ही गोखले<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,**<br>जिल्हा परिषद, पुणे-१<br>डॉ.एच.एस.चव्हाण | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** आरोग्य सेवक (पुरुष) भरतीचे तोंडी परीक्षा मुलाखतीचे सर्व उमेदवारांचे गुण मिळावेत |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. विठ्ठल अंकुश बांदल यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२२/०६/२०१० सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली माहिती मला दि.२३/१०/२००९ रोजी मिळाली असल्याने मी अपील माघारी घेत आहे', असे अपीलकर्ता श्री.बांदल यांचे दि.२३/१०/२००९ रोजीचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी दि.२३/०६/२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केले. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**पुणे.**
**दि :-** 28 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुनिलकुमार बावधनकर **अपीलकर्ता**
हिरामण लांडे बिल्डिंग, मुंबई-पुणे रोड,
कासारवाडी, पुणे-३४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,**
पुणे ग्रामीण, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,**
शिरुर पोलीस स्टेशन,
शिरुर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९८/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शिरुर पोलीस ठाण्यामध्ये दि.५/१२/२००७ रोजी दाखल झालेल्या तक्रार नं. १५२५/२००७ व केलेल्या कार्यवाहीबाबतचा सविस्तर तपशील | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सुनिलकुमार बावधनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, शिरुर पोलीस स्टेशन यांनी केलेली कार्यवाही व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे यांनी दिलेला निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 24 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिलकुमार बावधनकर
हिरामण लांडे बिल्डिंग, कासारवाडी,
मुंबई पुणे रोड, पुणे-३४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ,
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९९/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.पांडुरंग बाळू भोईर यांनी दि.३०/०५/२००७ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा तपशील | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री.सुनिलकुमार बावधनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली, पुणे यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुणे यांचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 21 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिलकुमार बावधनकर
हिरामण लांडे बिल्डिंग, कासारवाडी,
मुंबई पुणे रोड, पुणे-३४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),**
पंचायत समिती बारामती,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत मोरगांव,
ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७००/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ग्रामसेवक पदाचे अधिकार, कर्तव्य, वेतन, भत्ते तसेच श्री.दिलीप केशव बारभाई यांनी दि.२९/१०/२००७ रोजी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही व तदनुषंगिक एकूण ५ मुद्दे | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. सुनिलकुमार बावधनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या जोडलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मोरगांव यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बारामती, पुणे यांनी दिलेला निर्णय योग्य असून तो कायम करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,

ग्रामपंचायत, मोरगांव यांनी कळविल्यानुसार माहितीसाठीचे शुल्क रु.४०/- चा भरणा करुन अपीलकर्ता श्री.बावधनकर यांनी  माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 21 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. महादेव सोनबा कावळे
मु.पो. मरवडे,ता.मंगळवेढा, जि. सोलापूर .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी,
ता. मंगळवेढा, जि. सोलापूर .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मंगळवेढा,
ता. मंगळवेढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ९.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. महादेव सोनबा कावळे
मु.पो. मरवडे,ता.मंगळवेढा, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी,
ता. मंगळवेढा, जि. सोलापूर श्री. एस. सी. गरूड

**जन माहिती अधिकारी** तथा कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मंगळवेढा,
ता. मंगळवेढा, जि. सोलापूर श्री. एस. सी. गस्ते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.११.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मंगळवेढा यांच्याकडे मागितलेली माहिती अपुरी मिळाली. अद्यापही १० दिवसांत माहिती दिल्यास जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मंगळवेढा यांच्यावर कारवाई करू नये, असे निवेदन अपीलकर्ता श्री. महादेव सोनबा कावळे यांनी केले.

श्री. कावळे यांनी संपूर्ण तालुक्यातील सरसकट व विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. आपल्या कार्यालयाकडील माहिती दिली, मात्र अन्य चार ठिकाणची माहिती मंडळ कृषि अधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करून घेऊन देणे आवश्यक होते व मंडळ कृषि अधिकारी, मंगळवेढा, मंडळ कृषि अधिकारी, नंदेश्वर, मंडळ कृषि अधिकारी, मरवडे, मंडळ कृषि अधिकारी, आंधळगाव या मंडळ कृषि अधिकाऱ्यांना दोन पत्रे पाठवूनही त्यांच्याकडून माहिती मिळाली नाही. त्यामुळे ऊर्वरित माहिती विहित मुदतीत देता आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांनी केले. संबंधित कार्यालयाकडून माहिती प्राप्त करून घेऊन देण्यास २० दिवसांची मुदत मिळावी, अशी विनंती अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. एस. जी. गरूड यांनी केली.

जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांनी मंडळ कृषि अधिकारी, मंगळवेढा, मंडळ कृषि अधिकारी, नंदेश्वर, मंडळ कृषि अधिकारी, मरवडे, मंडळ कृषि अधिकारी, आंधळगाव या मंडळ कृषि अधिकाऱ्यांना दि. २१.११.२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्याबाबत कळविले. तद्नंतर 'माहिती त्वरित न दिल्यास होणाऱ्या दंडास आपणास जबाबदार धरण्यात येईल' अशी स्पष्ट सूचना देणारे स्मरणपत्र दि. १०.२.२००९ रोजी पाठविले. तरीही त्यांच्याकडून प्रतिसाद मिळालेला नसल्याचे जन माहिती अधिकारी श्री. एस. सी. सस्ते

यांनी दि. १२.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास कळविले. ऊर्वरित माहिती देण्यास आयोगाने १० दिवसांची मुदत दिल्याचे त्यांना मंडळ कृषि अधिकाऱ्यांनी दि. १३.४.२०१० च्या पत्रान्वये कळविले. दि. २२.४.२०१० रोजी आपल्याला जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मंगळवेढा यांच्याकडून माहिती मिळाली असून समाधान झाले, काही तक्रार नाही, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. कावळे यांनी दि. २२.०४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

वरील तपशील लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मंगळवेढा श्री. एस. सी. गस्ते यांनी माहितीबाबत मंडळ कृषि अधिकाऱ्यांना वस्तुत: माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार त्यांचा पाच दिवसांतच संबंधितांकडे माहितीसाठी अर्ज वर्ग करणे / कळविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी ३० दिवसांच्या मुदतीतही कळविलेले नाही, त्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे. तथापि दि. २१.११.२००९ रोजी कळविल्यानंतर व दि. ७.१.२०१० रोजी स्मरणपत्र दिल्यानंतरही मंडळ कृषि अधिकारी, मंगळवेढा, नंदेश्वर, मरवडे व आंधळगाव या चार मंडळ कृषि अधिकाऱ्यांनी दि. १३.४.२०१० पर्यंत तरी माहिती दिली नाही, असे जन माहिती अधिकारी श्री. एस. सी. गस्ते यांच्या वर उल्लेख केलेल्या पत्रांवरून स्पष्ट होते. मंडळ कृषि अधिकाऱ्यांना सूचना प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचा कालावधी माहिती देण्यास गृहित धरला तरी दि. २०.१२.२००९ पर्यंत माहिती दिली जाणे आवश्यक होते, ती दिलेली नाही. जन माहिती अधिकाऱ्यांनी ज्यांना माहिती देण्यास कळविले, असे मंडळ अधिकारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ अन्वये 'मानीव जन माहिती अधिकारी' ठरतात व माहिती विहित मुदतीत न दिल्याबद्दल शास्तीस पात्र ठरतात. यातील प्रत्येक मंडळ अधिकारी हे संबंधित माहितीसाठी स्वतंत्रपणे जन माहिती अधिकारी ठरतात, म्हणून शास्तीसाठी प्रत्येकाला स्वतंत्रपणे जबाबदार धरणे क्रमप्राप्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. के.जी. मांगडे, मंडळ कृषि अधिकारी, नंदेश्वर श्री. डी. एम. शेडगे, मंडळ कृषि अधिकारी, मरवडे श्री. ए. सी. धेडे व मंडळ कृषि अधिकारी, आंधळगाव श्री. ए. डी. कारंजकर यांनी मुदतीत माहिती न दिल्याबद्दल ते शास्तीस पात्र असून त्यांना प्रत्येकी रू. २५०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती त्यांच्या जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर, २०१० या महिन्यांच्या ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर २०१० मध्ये देय असणाऱ्या वेतनातून वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८), माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा, जि. सोलापूर यांनी करावी व आयोगाला अनुपालन अहवाल सादर करावा.

पुणे
दि. 30 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिपक शांतीलाल शहा
१३, ज्योती विहार, अपंग शाळेसमोर, वानवडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ-४, येरवडा, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
वानवडी विभाग, मगरपट्टा सिटी, पुणे शहर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५७ / २००९/ पुणे +३२९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिपक शांतीलाल शहा
१३, ज्योती विहार, अपंग शाळेसमोर, वानवडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ-४, येरवडा, पुणे प्रतिनिधी श्री.एम.आर.कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
वानवडी विभाग, मगरपट्टा सिटी, पुणे शहर, पुणे श्री.व्ही.टी.पवार

७ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

आपली तक्रार व प्रतिबंधक बॉन्ड रद्द करण्याची मागणी या अनुषंगाने दोन अर्जांद्वारे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग, मगरपट्टा सिटी, पुणे शहर, पुणे यांच्याकडे आपण माहिती मागितली होती. आपल्या जिवित व स्वातंत्र्याशी संबंधित अशी ही माहिती असल्यामुळे ४८ तासात मिळणे आवश्यक होते. परंतु तीन स्मरणपत्रे देऊनही माहिती मिळाली नाही. प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही दिशाभूल करणारी व अपुरी माहिती दिली आहे. जागेविषयीची आपली तक्रार असून त्यानुसार जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्यापेक्षा आपल्याकडून जागा काढून घेऊन दुसऱ्याला ताबा दिला आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दिपक शांतीलाल शहा यांनी केली.

अपीलकर्त्याने मागितलेली माहिती आणि केलेली तक्रार कोंढवा पोलीस ठाण्याच्या कक्षेतील असल्यामुळे त्यांच्याकडे पाठविली. 'प्रतिबंधक बॉन्ड रद्द करण्याच्या मागणीविषयी' एवढेच अपीलकर्त्याने माहिती-मागणी अर्जात नमूद केलेले असूनही त्यांना त्या मुद्दयासह सर्व माहिती देण्यात आली. विधी अधिकाऱ्याचा सल्ला घेऊन माहिती देण्यामुळे व पोलीस ठाण्याकडून आल्यानंतर माहिती देण्यामध्ये विलंब झाला. त्याबाबत अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले होते. बॉन्ड रद्द करण्याच्या मागणीबाबत माहिती श्री.शहा यांनी मागितली नव्हती, तर कार्यवाहीची मागणी होती. तसेच त्याच काळात अपीलकर्त्यांनी केलेल्या तक्रारीच्या चौकशीची कार्यवाही चालू होती. ती पूर्ण झाल्यानंतर माहिती देण्यात आली. अन्य काही व्यक्तींविरूध्द त्यांची तक्रार असून त्या व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात यावा, यासाठी श्री.शहा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोंढवा पोलीस ठाणे व सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी यांच्याकडे सातत्याने अर्ज करून दबाव आणण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यांची मागणी मान्य न केल्यामुळे चिडून जाऊन अशा प्रकारचे अर्ज व अपिले ते करीत असतात, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग, मगरपट्टा सिटी, पुणे शहर, पुणे श्री.व्ही.टी.पवार यांनी

केले. अपीलकर्त्याच्या अर्जाबाबतचा तपशील सादर करण्याच्या आयोगाच्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग, मगरपट्टा सिटी, पुणे शहर, पुणे यांनी दि.२.६.२०१० च्या पत्रान्वये तपशील सादर केला त्यानुसार ऑगस्ट २००९ ते फेब्रुवारी २०१० या काळात श्री.शहा यांनी माहितीच्या अधिकारातील चार अर्ज व जानेवारी २००९ ते मार्च २०१० या काळात विविध स्वरूपाच्या तक्रारींचे २४ अर्ज केल्याचे त्यात नमूद केले आहे. ही बाब स्वयंस्पष्ट आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्याबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.हरेश्वर वसंतराव तांबोळी
७८९, केशव प्लाझा,
५/६, पंताचा गोट, सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
राजधानी टॉवर्स, राजवाडयासमोर,
सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
राजधानी टॉवर्स, राजवाडयासमोर,
सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७७४/२०१०/सातारा |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.हरेश्वर वसंतराव तांबोळी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 JUN 2010.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.गणेश गबरु पवार
आपलेघर सोसायटी,
सर्व्हे नं.५६, चंदननगर,
पुणे-१४

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग,
नाशिक

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२,
येवला, जि.नाशिक

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७८५/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/०६/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.गणेश गबरु पवार<br>आपले घर सोसायटी, पुणे-१४<br>**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,**<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२, येवला, जि.नाशिक<br>श्री.पी.एम.चांदे, सहाय्यक जन माहिती अधिकारी | |

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,**<br>सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, नाशिक<br>श्री.भालचंद्र पाटील |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** १ जानेवारी २००८ ते ३१ डिसेंबर २००८ या कालावधीत अशासकीय व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या तक्रारींच्या छायाप्रती, उपविभागास लेखाशिर्षनिहाय प्राप्त झालेल्या व खर्च झालेल्या निधीचा तपशील, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्वाच्या छायाप्रती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.गणेश गबरु पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२२/०६/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली माहिती मला दि.२१/०६/२०१० रोजी मिळाली असून माझी माहितीबाबत काहीही तक्रार नाही. तरी सदरचे अपील निकाली काढावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.पवार सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे,
दि :- 27 JUN 2010